तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय
ता.सावंतवाडी

ई-मेल - tmosawantwadisindhu@gmail.com

जा.क्र.ता.आ.अका/दरपत्रक नोटीस/ ५९२ /२०२६, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय, ता.सावंतवाडी, दिनांक - ०३/११/२०२६

दरपत्रक मागणी नोटीस

सन 2026 - 2027 या आर्थिक वर्षात तालुका आरोग्य कार्यालय, सावंतवाडी अंतर्गत येणा-या प्रा.आ.केंद्र, नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, सावंतवाडी येथे आवश्यकतेप्रमाणे प्रसिध्दीसाठी वेगवेगळया प्रकारचे बॅनर तयार करुन घेतले जातात. सदरचे प्रसिध्दी साहित्य तयार करुन देणेकरिता इच्छुक दरपत्रक धारकांकडून खालील तपशिलात नमूद केलेप्रमाणे बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

अ. क्र.	तपशील		मक्तेदाराने सर्व करासहीत व खर्चासहीत भरावयाचा दर
	तालुका आरोग्य कार्यालय, सावंतवाडी अंतर्गत येणा-या प्रा.आ.केंद्र, नागरी आरोग्यवर्धिनी केंद्र व हिंदु हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, सावंतवाडी साठी खालील तपशिलाप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे प्रसिध्दी साहित्य तयार करणे.		
1	Flex मटेरिअलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करुन देणे	अंदाजे 200 स्के.फुट	मक्तेदाराने सर्व प्रकारच्या साहित्य प्रिंटिंगचा दर प्रती स्के.फुट प्रमाणे देणेत यावा.
2	Star Flex मटेरिअलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करुन देणे	अंदाजे 100 स्के.फुट	
3	Vinyl + Foam sheet मटेरिअलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करुन देणे	अंदाजे 300 स्के.फुट	
4	Backlight Flex मटेरिअलमध्ये बॅनर प्रिंटिंग तयार करुन देणे	अंदाजे 100 स्के.फुट	

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 10 दिवसांपर्यत म्हणजेच दिनांक 13/11/2026 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यत विहित नमून्यात परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास समक्ष आणून अथवा डाक सेवाव्दारे सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करुन अटी व शर्तीपूर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्त्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकला पुढील आदेश देणेत येईल. कार्यालयाकडुन देणेत येणा-या नमुन्यामध्ये व साईजमध्ये प्रिंटिंग करुन देणेचे आहे.

दरपत्रकाच्या अटी व शर्ती

01) दरपत्रक सादर करतेवळी दरपत्रकासोबत शासकिय संस्थेमार्फत दिलेला नोंदणी दाखला/ जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र तसेच नोंदणीपत्रकावर नमूद मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत जोडावयाचे आहेत. दरपत्रक सोबत सादर करावयाच्या बंद लखोटयांत सदरची नोंदणी प्रमाणपत्र व मालकाचे पॅनकार्ड झेरॉक्स सोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा सदरची दरपत्रक नामंजूर करणेत येतील.

02) वरील तपशीलात नमूद प्रिटिंग करावयाचे नमुने व प्रिटिंगची साईज आवश्यकतेनुसार ज्या दरपत्रक धारकाचे दरपत्रक मंजूर होईल त्यांना कळवीण्यांत येईल. त्यानुसार ठरवून दिलेल्या दिवशी सदर प्रिटिंग करुन या कार्यालयास पोंच करणे आवश्यक आहे. त्याकरीता अतीरिक्त कोणत्याही प्रकारचे चार्जेस अदा केले जाणार नाही. मंजुर दरपत्रकातील दर हे 31 मार्च 2027 पर्यंत राहतील.

03) दरपत्रक सादर करणेच्या शेवटच्या दिवशी दुपारी 3.00 वाजेपर्यन्त दरपत्रक स्वीकारली जातील इतर दिवशी कार्यालयीन वेळत पोस्ट अथवा हाती स्वीकारली जातील.

04) मंजूर दरपत्रकानुसार सदर काम पूर्ण झालेवर सर्व करांसहित झालेल्या कामाचे देयक त्वरीत कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. झालेल्या कामाच्या प्रत्यक्ष पहाणीनुसार व दरपत्रक नमूद दरानुसार देयक असल्याची पडताळणी करुन शासकीय प्रचलीत दरनुसार टी.डी.एस वजावट लागू असल्यास कर वजावट करुन देयकाची रक्कम संबधीत मक्तेदाराच्या बॅक खातेवर NEFT प्रणालीनुसार जमा करणेत येईल.

06) विहित मुदतीत आदेश दिलेपासून काम पुर्ण न केल्यास शासन नियमानुसार देय दंड देयकामधून वसूल केला जाईल.

07) मुदतीत प्राप्त न होणारी एक अगर सर्व दरपत्रके नाकारण्याचा अधिकार तसेच सर्व दरपत्रक प्रकीया रदद करण्यांचा अधीकार खाली सही करणार यांनी राखुन ठेवला आहे.

तालुका आरोग्य अधिकारी (गट-अ)
ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग

दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण

01) तालुका आरोग्य अधिकारी, सावंतवाडी नोटीसबोर्ड
02) www.nrhm.maharashtra.gov.in
03) www.arogya.maharashtra.gov.in

वरील संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून 10 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.